## माहे सप्टेंबर २०२१ मासिक अहवाल

## मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.


| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | रॅम्बो | १) पोहवा/११५६ ए.एस.गणेश<br>२) पद रिक्त आहे. | नेकनुर पो.स्टे. गु.र.नं. २०४/२०२१ भा.द.वि. कलम ३०२ हा गुन्हा दि. १५/९/२०२१ रोजी २३:१२ वा. दाखल असून सदर गुन्हयाचे घटनास्थळी मयताचे जवळ असलेली सुताची दोरीचा वास श्वान रॅम्बो यास देवुन सोडले असता श्वान घटनास्थळापासून शेतातुन पायवाटेने खडकी घाट गावाचे दिशेने अंदाजे ०२ कि.मी. रोडवर जावुन गोल फिरला.<br>पोलीस स्टेशनचे समोर मोकळे जागेत ०५ व्यक्तींना तीन फुट अंतरावर वेगवेगळे उभे केले असता श्वानास सुताची दोरीचा वास देवुन सोडले असता श्वान ०३ नंबरचे व्यक्तीजवळ जावून वास घेवुन बसला व भुंकला तसेच पुन्हा वेगवेगळे ठिकाणी उभे करून पुन्हा वास दिला असता ०४ नंबरचे इसमाजवळ जावुन श्वान बसला व संशयीत इसमाचे अंगावर उडी मारली सदर इसमांकडे पुढील तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. |




| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | भंडारा | नॉटी | १) पोहवा/७२१ टी.आर.कोरे<br>२) पोहवा / १७७ पी.एस. ढोरे | लाखांदुर पो.स्टे. गु.र.नं. २७८/२०२१ कलम ३०२, ३४ हा गुन्हा दि.२८/९/२०२१ रोजी १७:०६ वा. दाखल असून सदर गुन्हयातील संशयीत आरोपी असलेले दोन इसम व इतर तीन इसम यांना ४ फुट अंतरावर उभे करून मृत ास गळफास लावलेल्या हिरव्या पिवळी बॉर्डर असलेल्या साडीचा वास श्वान नॉटी यास देवून सोडले असता श्वानाने डाव्या बाजुस वास घेत घेत इसम क्र. २ च्या जवळ जावुन थांबला व भुंकला नंतर परत दुस-या बाजूने येवून इतर ३ इसमांचा वास घेत पुन्हा क्र. २ वर असलेल्या इसमावरचे भुंकून इशारा दिला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | हिंगोली | मॅक्स | १) पोहवा/२८० ए.सी. यादव<br>२) पोना/७०९ एन.एस.कावरखे | आखाडा बाळापूर पो.स्टे. गु.र.नं. १४/२०२१ भा.द.वि. ४५७, ३८० हा गुन्हा दि.०३/०९/२०२१ रोजी १६:१५ वाजता दाखल असून घटनास्थळा-पासून ५० मिटर अंतरावर असलेल्या रोडच्या कडेने अज्ञात चोरटयांनी अंगामध्ये परिधान केलेले एक गुलाबी रंगाचे शर्ट, एक निळया रंगाची जिन्सपॅन्ट, एक ग्रे रंगाची साधी पॅन्ट व एक चप्पल व शॉल आढळून आली. सदर वस्तुंचा वास श्वान मॅक्स यास दिला असता श्वान वास घेत घेत घटनास्थळा-पासून ७० ते १०० मिटर अंतरावर जावून थांबला व भुंकला पुढील तपास बाळापुर उमरा फाटा हिंगोली च्या दिशेने करीत असताना पाच संशईत इसम ताब्यात घेतले सदर इसमांची श्वान मॅक्स च्या मदतीने ओळखपरेड घेतली असता श्वान मॅक्स यास घटनास्थळावरी कपडयांचा वास देवुन सोडले असता तो घेत घेत इसम क्र. ४ चे जवळ वास घेवून त्याचेजवळ जा ूवन भुंकला पुन्हा ओळख परेड घेतली असता श्वान त्याच इसमाचे अंगावर भुकला सदर इसमांकडे पुढील तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४ | नाशिक शहर | गुगल | १) पो.हवा./७८ जी.अे.कोंडे<br>२) पोना / ६२५ ए.एस.चव्हाण | भद्रकाली पो.स्टे. गु.र.नं. २१६/२०२१ भा.द.वि. कलम ४५४, ४५७, ३४० हा गुन्हा दि.३१/८/२०२१ रोजी ०६:३० वा. दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळाची पाहणी केली असता संशईत इसमाने गुन्हा करतेवेळी हाताळलेल्या पैसे ठेवण्याच्या बॅग व सोने ठेवण्याच्या बॉक्स चा वास श्वान गुगल यास दिला असता श्वान गुगल घरात सर्वत्र फिरून मुख्य दरवाजातुन बाहेर पडून रस्त्याने वास घेत घेत सुमारे २०० ते ३०० मीटर अंतरावरील मशीदीच्या बाजुस असलेल्या रस्त्याने वास घेत एका घरात शिरला व संशईत इममच्या जवळ जावून भुकला सदर इसमास ताब्यात घेवुन तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ५ | गोंदिया | राणा | १) पो.हवा./८४२ शुक्ला<br>२) पोना / ६२५ ए.एस.चव्हाण | तिरोडा पो.स्टे., जि.गोंदिया, गु.र.नं.८०५/२०२१ भा.द.वि. कलम ३०२ हा गुन्हा दि.२१/९/२०२१ रोजी १८:१५ वा. दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळाची पाहणी केली असता घटनास्थळावर गुन्हयात वापरलेले घराच्या मुख्य दाराच्या समोरील भागात रक्त लागलेले एक लोखंडी स्पलेंडर मिळून आले. सदर लोखंडी स्पलेंडरच्या मागील भागाचा वास त.अ. व फिर्यादी यांचचा समक्ष श्वान राणास दिले असता श्वान घटनास्थळी घरातील आतील परिसरात वास घेत घेत फिरुन घ्राच्या आत समोरील दाराजवळ गळफास घेतलेले इसम नामे रेवचंद डेंगुजी उर्फ दिगंबर बिसेन, वय-४५ यांचे जवळ जाऊन वास घेऊन भुंकून दाखविले. पुन्हा सदर लोखंडी स्प्लेंडरचा वास श्वानास दिले असता श्वानाने वरील प्रमाणेच मार्गदशेन केले. श्वान पुढे जात नसल्याने व बाहेर पाऊस पडत असल्याने तसा रिपोर्ट तपासी अधिकारी यांना लावून श्वानाचे काम बंद केले व सदर लोखंडी स्प्लेंडर तपासी अधिकारी यांच्या स्वाधीन केले. पुढे तपासामध्ये सदर मयत इसम नामे रेवचंद डेंगुजी उर्फ दिगंबर बिसेन हेच आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. |



अशा प्रकारे माहे **सप्टेंबर २०२१** मध्ये खून-०३ आणि घरफोडी-०२ असे एकुण **०५** गुन्हे श्वान पथकामार्फत उघडकीस आलेले आहेत.